# पर्यावरणपूरक विकासच हवा



**किर्लोस्कर वसुंधरा आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख आणि पर्यावरणतज्ज्ञ डॉ. जय सामंत यांना 'वसुंधरा सन्मान' पुरस्कार देण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे प्रश्न युद्धपातळीवर हाताळून दूरगामी नियोजनाने एकात्मिक व सर्वसमावेशक विकास झाला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.**

## टॉक टाइम

**■ पर्यावरणाच्या विविध प्रश्नांवर जनजागृतीबद्दल काय सांगाल?**

जनजागृती आणि प्रत्यक्षातील कृती यामध्ये फारमोठे अंतर राहिले आहे. ३० वर्षांत पर्यावरणाची जनजागृती आणि माहिती सर्वसामान्यांना झाली आहे. पण सर्वसामान्यांच्या कृतीत पर्यावरण संवर्धन उतरत नाही, यामध्ये कुठेतरी विरोधाभास आणि दांभिकता दिसते. घोड्याला पाण्यापर्यंत नेले आहे, पण तो पाणीच पीत नाही अशी स्थिती आहे. समाज अधिकाधिक आत्मकेंद्री बनत आहे. पर्यावरणविषयक सर्वच पातळीवर प्रचंड अनास्था आहे. सरकारीपातळीवरही पर्यावरण संरक्षणाला नगण्य महत्त्व दिले जाते. विकास आणि वाढ यामध्ये असलेला फरक विचारात घेतला जात नाही.

**■ पर्यावरण संवंर्धन विकासात अडसर ठरतो असे सांगितले जाते, त्याबाबत काय सांगाल ?**

आर्थिक विकास हा नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असतो, त्यामुळे पर्यावरण संवंर्धनाशिवाय आर्थिक विकास होवू शकत नाही. पर्यावरण संवंर्धन जेंव्हा वैयक्तिक हेतूंच्या आड येते, तेंव्हा हेतुपुरस्सरपणे पर्यावरण विकासात अडसर आहे असे सांगितले जाते. आर्थिक विकास पर्यावरणावर अवलंबून आहे. आरोग्य, भवितव्य आणि रोजगार पर्यावरणावरच अवलंबून आहे. आपण इंधन म्हणून वापरत असलेले डिझेल आणि पेट्राल ज्या कच्च्या तेलातून मिळते त्यातूनच ३०० अन्य उपउत्पादनेही मिळतात. पर्यावरण संवंर्धन म्हणजे विकासाला विरोध ही भ्रामक कल्पना आहे. तंत्रज्ञान निसर्गाचे काम करू शकत नाही, आपण निसर्गावर आक्रमण केले आहे त्यावर विजय मिळवलेला नाही हे लक्षात ठेवावे. जर्मनीसारख्या उद्योगप्रधान देशात ग्रीन पार्टी सत्तेवर असून तेथील अण्वीक उर्जा निर्मितीचे प्रकल्प बंद केले जात आहेत. विकास आणि विस्तार म्हणजे वाळवंटीकरण नव्हे. आताच्या निर्णयावर पुढच्या पिढीचे अस्तित्व ठरणार असल्याने पर्यावरण संवंर्धनात युवकांनी अधिक लक्ष घातले पाहिजे.

**■ पर्यावरणपूरक विकास कसा असला पाहिजे?**

पर्यावरणपूरक विकास हा स्थानिक परिस्थितीनुरूप असला पाहिजे, नाहीतर एखाद्या भागातील विकासाचे चांगले मॉडले दुसऱ्या भागासाठी विनाशही ठरू शकतो. नदी खोऱ्यातील आणि पठारावरील विकासाचे मॉडेल डोंगररांगात राबवता येणार नाही. पर्यावरण संवंर्धनाअभावी विषमता वाढत आहे. नैसर्गिक साधनसामुग्रीचे वाटप अन्यायी पद्धतीने होत आहे. पर्यावरणपूरक विकासच चिरंतन विकास आहे. स्थानिक उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा विचार करून विकासाची दिशा ठरली पाहिजे. स्वयंपूर्ण प्रादेशिक विकासाची कल्पना स्वीकारली पाहिजे. संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक विकास झाला पाहिजे.

**■ पर्यावरण संवंधर्नात नागरिक काय योगदान देवू शकतील ?**

खरेतर पर्यावरण संवर्धनासाठी सरकारची वाट न पाहता स्वत:पासून सुरूवात केली पाहिजे. गावपातळीवर, परिसर पातळीवर आपण आणि आपला परिसर आरोग्यपूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. नवीन हरीततंत्रज्ञान स्वीकारून आयुष्याची गुणवत्ता वाढवली पाहिजे, यात युवक आणि महिला यांचे योगदान मोठे असेल. आपले भवितव्य कसेल असले पाहिजे हे आपणच ठरवले पाहिजे. साधनसामुग्रीचा अतिवापर, गैरवापर थांबवला पाहिजे. तथाकथित विकासाच्या मागे लागून पर्यावरणाचा फार मोठा ऱ्हास होत आहे. सरकारवर अवलंबून न राहता, सरकारला पर्यावरण संवंर्धनासाठी भाग पाडले पाहिजे.

* दै. महाराष्ट्र टाईम्स :- 19/09/2014